स्वयं दीप बनो
ENLIGHTEN YOURSELF

नोंदणी क्र. सोसायटी ॲक्ट: महाराष्ट्र/३६५/जळगाव पब्लिक ट्रस्ट ॲक्ट: एफ ३३९

# विवेकानंद प्रतिष्ठान, जळगाव

६६, सुयोग कॉलनी,जळगाव – ४२५००१ ☎: ०२५७ – २२३९०१४, २२३९०१२
**e-mail :** vivekanand@vpjal.org **website :** www.vpjal.org

जावक क्र. दि.

प्रति,

______________________________

______________________________

______________________________

**विषय :–** स्वातंत्र्यता साहित्य संमेलनात सहभागाबाबत..

मा.महोदय,

खान्देशातील बालसाहित्य चळवळ वृद्धिंगत होण्यासाठी विवेकानंद प्रतिष्ठान पुरस्कृत ‘खान्देश बालसाहित्य मंडळाचे’ योगदान आपण जाणतच आहात.

बालसाहित्य चळवळीला उपयुक्त कार्यक्रमांसोबत प्रतिवर्षी आयोजित होणारे ‘कुमार साहित्य संमेलन’ हे सुध्दा सर्व साहित्यिकांसाठी आकर्षण ठरत आहे.

यावर्षी **‘भारतीय स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव’** या संकल्पनेवर आधारित **‘स्वातंत्र्यता साहित्य संमेलनाचे’** आयोजन करीत आहोत. संमेलनात विविध साहित्य प्रकार अर्थात काव्यवाचन, कथा–कथन, अभिवाचन, प्रकट मुलाखत इत्यादींचे सादरीकरण होणार आहे. यासोबतच ज्येष्ठ साहित्यिकांचा सहवास अशा विविधतेने नटलेल्या साहित्य संमेलनाचे आयोजन **सोमवार, दिनांक ९ जानेवारी २०२३** रोजी करीत आहोत.

सदर संमेलनातील सादरीकरण उत्कृष्ट व्हावे या हेतूने **सोमवार, दिनांक २ जानेवारी २०२३** रोजी निवडफेरी घेण्यात येणार आहे. त्याबाबतची सविस्तर नियमावली व सूचनेचे पत्रक सोबत पाठवित आहोत. तरी आपल्या शाळेतील अधिकाधिक विद्यार्थी व साहित्यात रुची असलेल्या शिक्षकांना संमेलनात सहभागी होण्यासाठी प्रोत्साहित करावे, ही विनंती.

धन्यवाद.

विवेकानंद प्रतिष्ठान, रजि.नं. एफ-३३९ जळगांव महाराष्ट्र-३६५, सुयोग कॉलनी, जळगांव-४२५००१

सचिव,
विवेकानंद प्रतिष्ठान,जळगाव

## ♦ संमेलनाध्यक्ष निवड ♦

- प्रतिवर्षी कुमार साहित्य संमेलन अध्यक्ष निवड केली जाते.
- साहित्य क्षेत्रातील रुची या दृष्टीने लेखन, संशोधन, प्रकाशन तसेच कथा-कथन, काव्य लेखन इ. विषयात सक्रिय सहभाग नोंदवणाऱ्या विद्यार्थ्यांची गुणवत्तेच्या आधारावर तज्ज्ञ परीक्षकांमार्फत संमेलनाध्यक्ष म्हणून निवड करण्यात येते.
- संमेलनाध्यक्ष निवड प्रक्रिया सोमवार, दिनांक ०२/०१/२०२३ रोजी संपन्न होईल.
- अध्यक्ष पदासाठी इच्छुक उमेदवारांनी आपला संपूर्ण परिचय, स्व-रचित कथा, कविता संग्रह, यापूर्वी सहभागी कार्यक्रम, स्पर्धा वृत्तपत्रातील बातम्या, प्रमाणपत्र इत्यादी माहिती शाळेच्या मुख्याध्यापकांच्या **शिफारस पत्रासह** मुलाखतीस येतांना सोबत आणावी.

## ♦ सहभागासाठी सूचना व नियमावली ♦

- साहित्य संमेलन निवडफेरी सोमवार, दि.२ जानेवारी २०२३ रोजी आयोजित करण्यात आली आहे.
- निवड फेरीत निवड झालेल्या विद्यार्थ्यांचेच सादरीकरण दि.९ जानेवारी २०२३ रोजी आयोजित स्वातंत्र्यता साहित्य संमेलनात होईल, याच निवडफेरी दरम्यान सर्वोत्कृष्ट विद्यार्थ्यांची **साहित्य संमेलन अध्यक्ष** म्हणून निवड करण्यात येईल.
- काव्यवाचन, कथा-कथन, अभिवाचन, प्रकट मुलाखत इत्यादी सत्र संमेलनात होतील.
- **काव्य वाचन** : स्व-रचित अथवा संग्रहीत देशभक्तीपर स्फूर्तिदायी कवितांचे वाचन करता येईल. सादरीकरणासाठी ३ मिनिटे वेळ देण्यात येईल.
- **अनाम वीरा : कथा-कथन –** स्वातंत्र्यता संग्रामात योगदान देणाऱ्या खान्देशातील अज्ञात विरांच्या कथा सादर कराव्या लागतील. त्याची सत्यता तपासली जाईल. कथा-कथनासाठी ४ मिनिटे वेळ देण्यात येईल.
- **अभिवाचन** : कमीत-कमी २ व जास्तीत जास्त ६ विद्यार्थ्यांच्या समूहाने देशभक्तीपर प्रसंगांचे अभिवाचन करणे अपेक्षित आहे. साजेशी वेशभूषा करणे अपेक्षित आहे. अभिवाचनासाठी ७ मिनिटे वेळ देण्यात येईल.
- **अभिवाचनासाठी संदर्भ पुस्तकांची यादी सोबत देत आहोत –**
  १) माझी जन्मठेप, हिंदुत्व, ६ सोनेरी पाने-वि.दा.सावरकर २) सत्याचे प्रयोग-महात्मा गांधी ३) महानायक-विश्वास पाटील ४) माझी आत्मकथा-डॉ.बाबासाहेब आंबेडकर ५) अस्वस्थ दशकाची डायरी-डॉ.अविनाश धर्माधिकारी ६) शहीद भगतसिंग यांची जेल डायरी-अभिजीत भालेराव ७) आधुनिक भारताचे निर्माते-रामचंद्र गुहा ८) गीतारहस्य-लोकमान्य टिळक ९) शेतकऱ्याचा आसूड, गुलामगिरी – म.ज्योतीराव फुले १०) डॉ.हेडगेवार-ना. ह. पालकर १०) श्री गुरुजी-चं.प.भिशीकर ११) जालियनवाला बाग १२) क्रांतीवीर भगतसिंह-विठ्ठलराय भट १३) झांसी की रानी-वृंदावनलाल वर्मा १४) स्वामी विवेकानंद-रामकृष्ण मिशन १५) १८५७ चा राष्ट्रीय उठाव-लाला लजपतराय.
- **एक विद्यार्थी या तीनही प्रकारात सहभागी होऊ शकतो.**
- **निवडफेरी : डॉ.अविनाश आचार्य विद्यालय ६६,सुयोग कॉलनी, जळगाव येथे**
  **सोमवार, दिनांक ०२/०१/२०२३ रोजी, सकाळी ११:०० वा. संपन्न होईल.**
- **अधिक माहितीसाठी संपर्क : ९७६६९ ८८१७३, ७७९८४ ०६५१५, ९७६३४ ०३१२७**